रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस जि. सांगली.

## स्वयंसिद्धा- युवती संमेलन अहवाल २०१९-२०२०

अग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, शारदाबाई पवार महिला आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विकास मंडळाच्यावतीने दि. २६ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत स्वयंसिद्धा- युवती संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे हे नववे वर्ष होते. पण यंदा पहिल्यांदाच महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एल . डी. कदम साहेब यांनी प्रोत्साहित केल्यामुळे आपल्या महाविद्यालयातून पाच विद्यार्थिनी १) हर्षदा अनुसे ( बी. एस्सी. भाग -३) २) सायली तांबवेकर ( बी. एस्सी. भाग -३) ३) संपदा सूर्यवंशी ( बी. एस्सी. भाग -३) ४) शिवानी इंगळे(बी. सी. ए. भाग-२ ) ५) नम्रता चौगुले ( बी. एस्सी. भाग -१) यांनी प्राध्यापिका दळवी ए. एन. यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग नोंदवला होता. या संमेलनासाठी महाराष्ट्रातील विविध १७ महाविद्यालयातून १३३५ विद्यार्थिनीनी सहभाग नोंदवला होता.

तरुणाईच्या हृदयातील धग जाणून घेऊन स्वतःचा शोध घेण्याची तळमळ असणाऱ्या युवतींसाठी सामाजिक, सांस्कृतिक व उद्योग अश्या वेगवेगळ्या क्षेत्राची ओळख व्हावी व या क्षेत्रात बदल घडावा, मुलींमधील नेतृत्व घडावे या उद्देशाने स्वयंसिद्धा युवती संमेलनाचे आयोजन शारदानगर येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उदघाटन २६ डिसेंबरला दुपारी ३.०० वाजता कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. सौ. सुनंदा पवार, प्राचार्य प्रा. रा. बा. देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले यानंतर चार दिवस मा. डॉ. गीताली विनायक मंदाकिनी, सुनंदा पवार, मा. डॉ. चारुलता बापये, मा. मीना नाईक, मा. डॉ. अभिजीत सोनावणे, मा. डॉ. अविनाश सावजी, मा.डॉ. सुषमा भोसले, मा. अरुंधती हुगेन, मा. अभिषेक ढवाण यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. तसेच या व्याखानादरम्यान व्यक्तिगत परिचय व गट चर्चा ही करण्यात आल्या , तसेच एकांकिका , एकपात्री प्रयोग ही आयोजित करण्यात आले होते. तसेच "माझे महाविद्यालय - आमच्या महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट उपक्रम" आणि " मी युथ आयकॉन – माझी उत्त्कृष्ट कामगिरी" या स्पर्धानचेसुद्धा आयोजन करण्यात आले होते संमेलनाच्या शेवटच्या दिवशी पारितोषिक वितरण करण्यात आले. यात महाविध्यालयातील बी. एस्सी. भाग -१ ची विद्यार्थिनी नम्रता चौगुले हिने 'मी युथ आयकॉन' या स्पर्धासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. या संमेलनाचा समारोप हा मा. श्री. इंद्रजीत देशमुख यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने करण्यात आला व सहभागी सर्व विद्यार्थिनीना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.










| शिक्षक व्यवस्थापक | चेअरमन | प्राचार्य |
|---|---|---|
| (प्रा. दळवी ए. एन.) | ( प्रा.पुदाले पी. डी.) | ( डॉ. एल. डी. कदम.) |